अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज.) कार्यालय,
पुणे महानगरपालिका.
जा. क्र.: अतिमआ(ज.)/ सका/ ८७२
दिनांक : २६/१२/२०१३

## – कार्यालयीन आदेश –

**विषय :- कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) अधिनियम, १९७० मधील तरतुदींची अंमलबजावणी.**

**संदर्भ :-**
१. अधिकार सुपूर्ती आज्ञापत्र जा.क्र.मआ/२[illegible]८/०८/२००६. । प-५०
२. अधिकार सुपूर्ती आज्ञापत्र जा.क्र.मआ/सका/६६, दि.२२/०४/२०१३. । प-५६

पुणे महानगरपालिकेतर्फे विविध विकास प्रकल्प आणि देखभाल दुरूस्तीची कामे निविदा मागवून खाजगी ठेकेदाराकडून करुन घेण्यात येत असतात. विषयांकित अधिनियमातील तरतुदीच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीबाबत इकडील कार्यालयाकडून वेळोवेळी कार्यालय परिपत्रके/ कार्यालयीन आदेश तसेच तज्ञ व्यक्तिकडून मार्गदर्शनपर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले आहे. प-२ ते ४८

ज्या ठेकेदारांमार्फत २० पेक्षा जास्त कामगार कामासाठी नियुक्त केले जातात त्यावेळी ठेक्याने काम देणाऱ्या संस्थेने व काम करण्याऱ्या ठेकेदाराने कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) अधिनियम १९७० मधील तरतुदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्याकडून (कामगार उप आयुक्त कार्यालय, पुणे) नोंदणी दाखला व परवाना घेणे बंधनकारक आहे.

कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) अधिनियम, १९७० मधील कलम २१(२) नुसार नोंदणीसाठी ठेकेदारांना द्यावयाचा दाखला (नमुना नं.५) चे तसेच सदर अधिनियमातील कलम ७(१) अन्वये मूळ मालक (Principal Employer) या नात्याने नोंदणी दाखला घेण्याचे मा.महापालिका आयुक्त यांचे अधिकार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ६९ नुसार सर्व मा.खाते प्रमुखांना संदर्भ क्र.१ व २ चे अधिकार सुपूर्ती आज्ञापत्रकान्वये प्रदान करण्यात आले आहे. प-५० ते प-५६

सबब, प्रकरणी संबंधित खातेप्रमुख यांनी पुढील बाबींबाबत काटेकोर अंमलबजावणी करावी.

१. ज्या खात्यांतर्गत २० किंवा त्यापेक्षा जास्त कंत्राटी कामगारांकडून ठेकेदारी पध्दतीने काम करुन घेण्यात येते अशा सर्व खातेप्रमुखांनी कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) अधिनियम,१९७० मधील कलम ७ (१) अन्वये मूळ मालक (Principal Employer) या नात्याने नोंदणी दाखला मा.कामगार उप आयुक्त, पुणे यांचे कार्यालयाकडून प्राप्त करुन घ्यावा.

२. कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) अधिनियम,१९७० मधील कलम २१ (२) नुसार संबंधित ठेकेदारास काम दिल्यानंतर कामगार परवाना घेण्यासाठी नमुना '५' (V) मध्ये दाखला देण्यात यावा.

३. सदर नोंदणी दाखल्यांसाठी आवश्यक फी संबंधित खात्यांच्या संकिर्ण या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकामधून खर्ची टाकण्यात यावी.

४. कंत्राटी कामगारांच्या वेतनाबाबत सर्व नोंदी विहित नमुन्यामध्ये संबंधित खात्याने अद्ययावत ठेवाव्यात. त्यामध्ये ठेकेदाराचे नाव, कामाचे ठिकाण, कामाची मुदत, मजूर संख्या, बयाना रक्कम, कामाची प्रगती, हजेरीपत्रक, वेतनपत्रक, दंड, ओव्हरटाईम इ.बाबत स्वतंत्र रजिस्टर ठेवण्याची कार्यवाही संबंधित ठेकेदार व खातेप्रमुख यांनी करावी.

५. कंत्राटी कामगारांना देय कर्मचारी भविष्य निर्वाह निधी, राज्य कामगार विमा योजना व कामगार कल्याण निधी इ. रकमा संबंधित प्राधिकाऱ्याकडे मालकाचा व कामगारांचा हिस्सा जमा केल्याबाबत खात्यातील पर्यवेक्षकीय अधिकारी यांनी खातरजमा केल्याशिवाय ठेकेदाराचे बील आदा करण्यात येवू नये.

६. संबंधित खात्यातील ठेकेदारांमार्फत कंत्राटी कामगारांना देण्यात येणारे वेतन धनादेशाद्वारे आदा करणे बंधनकारक राहिल.

७. ठेकेदाराला वर्कऑर्डर देताना त्यामध्ये संबंधित ठेकेदाराकडून दैनंदिन किती कामगार (कुशल, अर्धकुशल, अकुशल) वापरण्यात येणार आहे त्यांची संख्या वर्कऑर्डरमध्ये नमूद करण्यात यावी. तसेच, काही ठिकाणी मशिनरीचा (मशिनरीचा प्रकार/नाव) वापर करण्यात येत असल्यास तसे वर्कऑर्डरमध्ये नमूद करण्यात यावे.

८. ठेकेदारामार्फत कंत्राटी कामगारांना महिनेमहाचे वेतन कोणत्याही परीस्थितीत महिन्याच्या ७ तारखेच्या आत आदा करण्यात येत असल्याबाबत खात्याने दक्षता घ्यावी.

९. महापालिकेकडून संबंधित ठेकेदारास किमान वेतन दरामध्ये बोनस दिला असल्यास सदर बोनसची रक्कम संबंधित ठेकेदाराने काम संपल्यानंतर त्याचेकडील कंत्राटी कामगारांना धनादेशाद्वारे आदा करणे आवश्यक आहे याबाबत खात्याने दक्षता घ्यावी.

१०. ठेकेदारामार्फत कंत्राटी कामगारांची सेवा घ्यावयाची असल्यास कंत्राटी कामगारांच्या किमान वेतनदराबाबत निविदा काढण्यापूर्वी सल्लागार (कामगार) कार्यालयाकडील अभिप्राय घेण्यात यावा.

११. ज्या ठिकाणी केवळ कंत्राटी कामगारांची सेवा घेण्यात येणार आहे अशा बाबतीत संबंधित ठेकेदारास त्याचेकडील कामगारांना विहित दराने किमान वेतन व तदनुषंगिक

--३/--

फायदे देय होतील अशाच निविदा मान्य करण्यात याव्यात. त्यापेक्षा कमी दराने प्राप्त झालेल्या निविदा मान्य करण्यात येवू नयेत व तशी अट निविदेच्या जाहिरातीमध्ये नमूद करण्यात यावी.

१२. कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) अधिनियम,१९७० मधील तरतुदींच्या अंमलबजावणीकामी कार्यालय परिपत्रक जा.क्र.मआ/सका/६७, दि.२२/०४/२०१३ सोबत 'कंत्राटी कामगारांचे वेतनाबाबतचा दाखला' यापूर्वीच प्रसृत करण्यात आला आहे. सदरहू दाखला ठेकेदाराने त्याच्या बिलासोबत समाविष्ठ करणे आवश्यक राहिल व असा दाखला असल्याशिवाय मुख्य लेखापाल कार्यालयाकडून संबंधित ठेकेदाराचे बील आदा करण्यात येवू नये असे आदेश देण्यात आले आहेत. त्यानुसार मुख्य लेखापाल कार्यालयाकडून कार्यवाही होणे आवश्यक आहे.

१३. जे ठेकेदार कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) अधिनियम, १९७० मधील तरतुंदीच्या अनुषंगाने औद्योगिक व कामगार कायद्यांचा भंग करतील अशा ठेकेदारांची नावे काळ्या यादीत टाकणेबाबतची कार्यवाही प्रस्तावित करावी.

१४. कामगार संख्या, त्या अनुषंगाने लागू होणारे कामगार कायदे व वर्गणीचा तपशील पुढीलप्रमाणे आहे:-

| अ. क्र. | कामगार संख्या | लागू असलेले कामगार कायदे | मालकाची वर्गणी |
|---|---|---|---|
| १ | १ | किमान वेतन अधिनियम, १९४८<br>(विहित दर+ विशेष भत्ता) | - |
| २ | ५ | मुंबई कामगार कल्याण निधी अधिनियम, १९५३<br>(मासिक वेतन रु.३०००/- च्या पुढे) | रु.६/- प्रतिमाह |
| ३ | १० | १. राज्य कामगार विमा अधिनियम, १९४८ | ४.७५% |
| | | २. बोनस प्रदान अधिनियम, १९६५ | ८.३३% |
| | | ३. तोषदान प्रदान अधिनियम, १९७२<br>(५ वर्षांच्या सेवेनंतर) | विहित आकारणीनुसार |
| ४ | २० | १. कंत्राटी कामगार (नियमन व निर्मूलन) अधिनियम, १९७० | नोंदणी दाखला घेणे |
| | | २. कामगार भविष्य निर्वाह निधी अधिनियम,१९५२ | १३.६१% |
| ५ | ५० | महाराष्ट्र कामगार किमान घरभाडे अधिनियम, १९८३ | ५% |

याशिवाय-

| | |
|---|---|
| रजा वेतन | ६.७१% |
| सेवाकर | १२.३६% |
| पर्यवेक्षकीय शुल्क | अंदाजे १०% (Negotiable) |

--४/--

कामगारांच्या हिश्श्यापोटी मुळ पगार + विशेष भत्ता यामधून १.७५% ई.एस.आय. व १२% भविष्य निर्वाह निधी व उपरोक्त टक्केवारीनुसार मालकाचा हिस्सा इ.एस.आय.४.७५% व भविष्य निर्वाह निधी १३.६१% संबंधित कार्यालयाकडे भरणे ठेकेदारावर बंधनकारक आहे. यासाठी कामगारांचे नांवे ई.पी.एफ. व ई.एस.आय. महामंडळाकडे स्वतंत्र कोड नंबर्स घेवून त्या खात्यावर दरमहा वर्गणी (कामगार व मालक हिस्सा) जमा करण्याची जबाबदारी ठेकेदाराची आहे.

१५. अधिनियमातील तरतुदींची अंमलबजावणी ठेकेदाराकडून करुन घेण्याची जबाबदारी पर्यवेक्षकीय अधिकाऱ्यांची असून यामध्ये हयगय झाल्यास अधिनियमातील तरतुदीनुसार संबंधित पर्यवेक्षकीय अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित होते.

१६. पुणे महानगरपालिकेमध्ये कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) अधिनियम १९७० मधील तरतुदींच्या अनुषंगाने वेळोवेळी कार्यालय परिपत्रके प्रसृत करण्यात आली आहेत. त्यानुसार सर्व खात्यांकडून कार्यवाही होणे आवश्यक आहे.

उपरोक्त बाबींच्या अनुषंगाने अनियमितता झाल्यास वा महापालिकेस आर्थिक तोषिस लागल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधित खातेप्रमुख/पर्यवेक्षकिय अधिकारी यांची राहिल, याची कृपया नोंद घ्यावी.

अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज.),
पुणे महानगरपालिका.

प्रत :
सर्व मा. खातेप्रमुख / विभाग प्रमुख
पुणे महानगरपालिका.

यांजकडेस पुढील कार्यवाहीसाठी...

प-५६

महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका.
क्र.एमसी/डिईएल/१४०९
दिनांक 18 AUG 2006

महापालिका आयुक्त कार्यालय,
पुणे महानगरपालिका.
जावक क्रमांक : मआ/ २१५
दिनांक 18 AUG 2006

## अधिकार - सुपूर्ति
## आज्ञापत्र

विषय : कंत्राटी कामगार (नियुमन व निर्मूलन) अधिनियम १९७० मधील कलम २१(२) नुसार दाखला देणे.

कंत्राटी कामगार (नियमन व निर्मूलन) अधिनियम १९७० मधील कलम २१(२) नुसार नोंदीसाठी ठेकेदारांना द्यावयाचा दाखला (नमुना नं.५) चे मा.महापालिका आयुक्त यांचे अधिकार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६९ नुसार सर्व खातेप्रमुखांना या आज्ञापत्राच्या दिनांकापासून सुपूर्त करण्यांत येत आहेत.

तरी प्रकरणी सर्व संबंधित खातेप्रमुखांनी याची नोंद घेऊन कार्यवाही करावी.

महापालिका आयुक्त,
पुणे महानगरपालिका.

प्रत :
सर्व मा. खातेप्रमुख,
पुणे महानगरपालिका.
यांजकडेस पुढील कार्यवाहीसाठी..

सल्लागार (कामगार),
पुणे महानगरपालिका.

प-६४ फ-९

मा.महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका.
अधिकार सुपूर्ती क्र. एम.सी./डी.ई.एल/१/१४७८
दिनांक : २२/०४/२०१३

महापालिका आयुक्त कार्यालय,
पुणे महानगरपालिका.
जा. क्र. : मआ/सका/६६
दिनांक : 22/4/2013

# अधिकार - सुपूर्ती

## आज्ञापत्र

**विषय: कंत्राटी कामगार (नियमन व निर्मूलन) अधिनियम,१९७० मधील कलम ७(१) नुसार नोंदणी दाखला घेणे.**

कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) अधिनियम,१९७० मधील कलम ७ (१) अन्वये मूळ मालक (Principal Employer) या नात्याने नोंदणी दाखला घेण्याचे मा.महापालिका आयुक्त यांचे अधिकार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम,१९४९ चे कलम ६९ नुसार सर्व खातेप्रमुखांना या आज्ञापत्राच्या दिनांकापासून सुपूर्त करण्यात येत आहेत.

तरी प्रकरणी सर्व संबंधित खातेप्रमुखांनी याची नोंद घेवून कार्यवाही करावी.

महापालिका आयुक्त,
पुणे महानगरपालिका.

प्रत:
सर्व मा.खातेप्रमुख,
पुणे महानगरपालिका.
यांजकडेस पुढील कार्यवाहीसाठी......

22-4-13
सल्लागार (कामगार)
पुणे महानगरपालिका.